स्थायी समिती

दाखल विषय – दि. १७/३/२०२०

**विषय क्रमांक :– २४१४ त्वर्य**

प्रभाग नं.३५ (जुना ६८) तळजाई मंदिर ते सदुशिंदे क्रिडांगणापर्यंतच्या रस्त्यावर सायकल ट्रॅक विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अभिजित एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,६१,४१३/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ४४,१६,७९८=८७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,३५,३६९=५६ अधिक मटेरीयल टेस्टिंग चार्जेस र.रूपये ३,१५०/- पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार आदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२३९ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४१५ त्वर्य**

मा.धीरज घाटे, सभागृह नेता व मा.अविनाश साळवे यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचे सध्याचे वाढलेले एकूण भौगोलिक क्षेत्र, शहराची जवळपास ३५ लाखांपेक्षा जास्त असणारी लोकसंख्या,शहराची झालेली सर्वांगिण वाढ व होत असलेला विकास यामुळे पुणे महानगरपालिकेस राज्यामध्ये ‘अ’ वर्ग महानगरपालिकेचा दर्जा प्राप्त होऊन सर्वात मोठी असणा-या बृह्नमुंबई महानगरपालिकेच्या नंतर पुणे महानगरपालिकेचा राज्यामध्ये क्रमांक लागतो.

शहराचा वाढलेला विस्तार व झालेला सर्वांगिण विकास पाहता, शहरातील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सोयीसुविधा पुरविणे ही महानगरपालिकेची जवाबदारी आहे. यामध्ये अग्निशमन सेवेचा अत्यंत प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे. सध्या शहरामध्ये एकूण १४ अग्निशमन केंद्रे कार्यरत असून सध्याचा शहराचा विस्तार व लोकसंख्येचा विचार करता, आणखी किमान २२ ते २३ अग्निशमन केंद्रे उभारणे आवश्यक आहे. याकरीता जागा निवडणे, नियमानुसार/खात्याच्या कामकाजाच्या गरजेनुसार केंद्राची उभारणी करणे, पुरेसे मनुष्यबख उपलब्ध करून घेणे, आधुनिक पद्धतीची व पुरेशी वाहने, यंत्रसामुग्री प्राप्त करून घेणे व हे करीत असताना अग्निशमन दलाचे नियमितपणे असणारे अग्निशमन व बचाव कार्याचे कामकाज करणे अशी जवाबदारी अग्निशमन विभागाचे खातेप्रमुख म्हणून ‘मुख्य अग्निशमन अधिकारी’ यांचेवर असते. यासोबतच सध्या पुणे शहरामध्ये होणारे मेट्रोचे जाळे व तेथील अग्निसुरक्षा उपाययोजना , नविन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली आणि एनबीसी २०१६ नुसार अग्निसुरक्षा उपाययोजनांची कार्यवाही या बाबीही ‘मुख्य अग्निशमन अधिकारी’ यांना सांभाळाव्या लागत आहेत.

पुणे महानगरपालिकेमध्ये ‘मुख्य अग्निशमन अधिकारी’ हे पद खातेप्रमुख या दर्जाचे असून, अग्निशमन दल हे मनपाचे एक स्वतंत्र खाते म्हणून कार्यरत आहे. यासोबतच शहर आणि संपूर्ण जिल्ह्यामध्ये येणा-या आपत्तीचे वेळी त्यावरील नियंत्रण आणि प्रत्यक्ष कार्यवाही करण्याचे काम पुणे मनपाचे अग्निशमन दल मुख्य अग्निशमन अधिका-यांचा नियंत्रणात करत असते. खात्याच्या कामकाजावर ‘मुख्य अग्निशमन अधिकारी’ यांचे नियंत्रण राहते. पुणे महानगरपालिकेमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी हे कायम मा.अतिरिक्त महापालिक आयुक्त यांचे नियंत्रणाखाली खातेप्रमुख म्हणून कामकाज करीत आलेले आहेत.

शहराच्या वाढत्या विस्तारासोबतच अग्निशमन सेवेचाही जलदगतीने विस्तार करणे व त्याद्वारे शहरातील नागरिकांना अग्निशमन दलाची सेवा तातडीने उपलब्ध करून देणेसाठी खात्याचा सर्वांगिण विकास होण्याचे व शहराची अग्निशमन सेवा अधिक बळकट व सक्षम होण्याचे दृष्टीने मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद वरिष्ठ श्रेणीत उन्नत करून त्यास उप आयुक्त पदाचा दर्जा देणे उचित होईल, असे आम्हांस वाटते.

तरी पुणे महानगरपालिकेकडील मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाचे सुधारित पदनाम **‘उप आयुक्त तथा मुख्य अग्निशम अधिकारी’** असे करून त्यास पुणे मनपाप्रमाणे वेतनश्रेणी र.रू.१५६००-३९१०० + ग्रेड पे रू.८९००/- अधिक मान्य भत्ते अशी देणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

**विषय क्रमांक :– २४१६ त्वर्य**

प्रभाग क्र.८ क पताशीबाई छाजेड मनपा शाळा, बोपोडी मध्ये ई-लर्निंग स्कूल अनुषंगाने विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ए.एस.वाणी अ‍ॅन्ड असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,१६,५३२/-पेक्षा १६.८५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३६,७२,३४६=३५ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.५,२९,९८३=८४ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १,४१३=४० पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.९,६६०/- पर्यंत अधिक अटीशर्तीतील सिमेंट,स्टील यांना विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२१९, दि.१३/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २४१७ त्वर्य**

प्रभाग क्र. १० ड बावधन कोथरूड डेपो अंतर्गत कोथरूड भुसारी कॉलनी परिसरामध्ये स.नं. ९८ येथे उद्यान (चिल्ड्रन पार्क) तयार करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३०,६१,६७५=५६ पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०,३१,३६४=९७ पर्यंत काम करुन घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी.र.रू.३,६३,७६३=८० अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.४४,५२२=१० व टेस्टिंग चार्जेस र.रू.२६,३५७/- पर्यंत अदा करणेस अधिक अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२२० दि.१३/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २४१८ त्वर्य**

प्रभाग क्र.२८ ब मध्ये वखार महामंडळ चौक येथे उड्डाणपूल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.वालेचा इंजिनिअरींग लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १३,३२,९३,२०१/- पेक्षा १.१०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.१३,४७,५९,४२६=२१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी.र.रू.१,६१,७१,१३१=१५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.६,३६,६२४/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू.७,०६,७७५/- पर्यंत अदा करणेस व निविदा अटी शर्तीनुसार भाववाढ आणि विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मु.अ(प्र)/१२२१, दि.१३/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २४१९ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील मिळकतकराची वार्षिक देयके छपाई करणेसाठी आयसीआयसीआय बँक, पुणे यांनी सन २०२०-२१ या वर्षातील मिळकतकराची देयके, कागद व छपाईसह यासह पूर्णत: खर्चाची तयारी दर्शविल्यानुसार आयसीआयसीआय बँकेच्या नावाने जाहिरात व लोगो मिळकतकर देयकावर उपलब्ध होणा-या जागेनुसार छापण्यास मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टॅक्स/१२२३ दि.१६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २४२० त्वर्य**

युवक कल्याणकारी योजना अंतर्गत विविध योजना राबविणे साठी र.रु. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सविवि/१२२६ दि.१६/०३/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, समाज विकास विभाग, **FE14D147**, ४ क युवक कल्याणकारी योजना (सर्व १५ क्षेत्रिय कार्यालयामध्ये युवकांना विविध प्रकारचे समुपदेशन करण्यासाठी समुपदेशकांची नियुक्ती करणे.) | २५ लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम</u><br>समाज विकास विभाग, **FE14D101**, ४ क युवक कल्याणकारी योजना (शहरातील तरूणांसाठी स्वयंरोजगार व प्रशिक्षणासाठी अनुदान देणे) | --- | २५ लाख |

**विषय क्रमांक :- २४२१ त्वर्य**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत परवडणारी घरे या कामासाठी पुणे महानगरपालिका हद्दीतील हडपसर येथील CONSTRUCTION OF AFFORDABLE HOUSING PROJECT OF 100 EWS TENEMENTS UNDER PRADHAN MANTRI AWAS YOJANA (U) AT HADAPSAR ON LAND BEARING S.NO. 106A, Hissa No. 12B/3B, PUNE या जागेवर १०० सदनिकांच्या घरकुलाचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कोटीभास्कर इन्फ्रास्ट्रक्चर & डेव्हलपर्स प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८,२९,९३,३१८/- फक्त (वस्तु व सेवा कर वगळून) पेक्षा २.१६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८,१२,००,०००/- अधिक वेळोवेळी लागू असणारे देय वस्तु व सेवा कर तसेच टेंडर अटी व शर्तीनुसार सर्वसाधारण भाववाढ (Price variation clause) सुत्रानुसार व डांबर, सिमेंट व स्टील या विशेष भाववाढ (star rate) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/पंआयो/१२२८ दि. १६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२२ त्वर्य**

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत परवडणारी घरांची निर्मिती करणे कामी पुणे महानगरपालिका हद्दीतील हडपसर येथील Construction of Afffordable Housing Project of 585 EWS Tenements +224.70 sq.m. of refuge area under Pradhanmantri Aawas Yojana ( U) At Hadapsar on Land Bearing S.no. 89 ( P) , 92 ( P) , Pune कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार करण बिल्डर्स यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ४५,३६,१७,९०३/– फक्त (वस्तु व सेवा कर वगळून) पेक्षा २.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४,४०,९१,९२८/– अधिक देय वस्तु व सेवा कर तसेच टेंडर अटी व शर्तीनुसार सर्वसाधारण भाववाढ ( Price variation clause) सुत्रानुसार व डांबर, सिमेंट व स्टील या विशेष भाववाढ ( star rate) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/पंआयो/१२२९ दि. १६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२३ त्वर्य**

कोंढवा परिसरातील भैरोबा नाला व त्याचे उपनाले यात अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्या व चेंबर्स दुरूस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६१,१५,६४९/– पेक्षा २३.५९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४६,७२,९६७=४० व अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,६०,७५६=०९ एकूण र.रू. ५२,३३,७२३=४९ व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा–या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१२३० दि.१६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२४ त्वर्य**

धनकवडी मधील आंबेगाव पठार फॉरेस्ट कडेला १८ मी.डी.पी. रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जॅगसन बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३१,८९,६१७=८६ पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु २६,१५,४८६=६५ पर्यंत काम करून घेणेस, अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,८२,७५४=१४ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.१७,८०८=८४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ९,५५६/– पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२३१ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२५ त्वर्य**

प्रभाग क्र.२५ ब मधील स.नं.६४ संविधान चौक व विविध चौक सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आनंद बिल्डींग कॉन्ट्रक्टर यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २६,७४,४०७/– पेक्षा १६.६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु २२,२८,८५०=७९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,२०,९२८=८४ अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४,५१५/– पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२३२ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२६ त्वर्य**

साठे वस्ती लेन क्र.१ ते ८ धानोरी लोहगाव व परिसरात मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे भाग–१ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी एन चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,२५,८१५=६८ पेक्षा २८.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६३,३८,२२१=७१ व अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,६०,५८६=६० एकूण र.रू. ७०,९८,८०८=३१ व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा–या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/१२३३ दि.१६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२७ त्वर्य**

३२ एम.एल.डी. विठ्ठलवाडी एस.टी.पी. लगत ९०० मि.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. देवकर ॲन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,३७,१००/– पेक्षा २५.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,५१,४४७=२७ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,५४,१७३=६७

असे एकूण र.रू. ३३,०५,६२०=९४ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा–या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनिःसारण/१२३४ दि.१६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२८ त्वर्य**

भैरोबा नाला कोंढवा दशक्रिया घाट आणि भिमनगर येथे नाल्यास रिटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. साईलिला कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५९,०१,८४२=९०/– पेक्षा १३.८६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५०,८३,८४७=४७ व अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,१०,०६१=७० एकूण र.रू. ५६,९३,९०९=१७ व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा–या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनिः/१२३५ दि.१६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४२९ त्वर्य**

प्रभाग क्र.१४ मध्ये सेनापती बापट रस्ता, हरेकृष्ण रस्ता, धोत्रे रस्ता, कमला नेहरू गार्डन जवळील रस्ता इ.ठिकाणी डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,२१,१२०/– पेक्षा १५.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ७५,३७,४५४=२९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,७०,५३४=४० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये ६,७२२/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२३६ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३० त्वर्य**

प्रभाग क्र.१३ ड समर्थ पथ (अलंकार पोलीस स्टेशन ते मोरयाकृपा सोसायटी) येथे पदपथ,प्रकाश व्यवस्था, दुभाजक, सुशोभिकरण इ. कामे करणे व प्रभाग क्र.१३ ड शैलेश पूल ते नवसह्याद्री पोस्ट ग.ह.कुलकर्णी रस्ता येथे पदपथ,प्रकाश व्यवस्था, दुभाजक, सुशोभिकरण इ. कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७०,५४,२३६=७० पेक्षा ३.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ६७,७२,७७२=६६ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ८,४६,५०८=४० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ८८,६२०=१८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये १०,६०५/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२३७ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३१ त्वर्य**

प्रभाग क्र.२० क मध्ये संगमवाडी पासून ते आर टी ओ चौक दरम्यान मुळामुठा नदीवर नविन पुल बांधणे या कामाचा जोड रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिवस्वयंभू रियल्टर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८७,६७,०४०=३६ पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ८६,७९,३६९=९६ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस, अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,५२,०४४=८४ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ६८,०१९=८८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये १,१२,८९२/– पर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२३८ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३२ त्वर्य**

साठे वस्ती लेन क्र.१ ते ८ धानोरी लोहगाव व परिसरात मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे भाग–२ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी एन चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,६२,८०८=४७/– पेक्षा २८.९९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,६९,०४०=२९ व अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,८०,२८४=८३ एकूण र.रू. ३५,४९,३२५=१२ व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा–या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनिः/१२४० दि.१६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३३ त्वर्य**

प्रभाग क्र.२६ क कौसरबाग येथील २० मी.डी.पी. रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जॅगसन बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६१,५७,०७५/– पेक्षा १५.२१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ५२,२०,५८३=८९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,३८,८४९/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.५०,८८२=४० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये २०,२१५/– पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२४१ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३४ त्वर्य**

प्रभाग क्र.१४ ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अ‍ॅन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८४,८१,३१३=०१/– पेक्षा १०.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७६,२४,७००=३९ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ९,१४,९६४=०४ असे एकूण र.रू. ८५,३९,६६४=४३ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणा–या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१२४२ दि.१६/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३५ त्वर्य**

प्रभाग क्र.२९ ब दत्तवाडी, बाल शिवाजी मित्रमंडळ समोरील पूल रूंद करणे व तेथील चौक विकसित करणे, उर्वरित काम करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखील कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३०,७९,७६२=३३ पेक्षा अ‍ॅटपार ) असल्याने त्यांचेकडून र.रु ३०,७९,७६२=३३ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,६५,९१२=३६ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १,५८३/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये ९८,३४३/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/१२४३ दि. १६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३६ त्वर्य**

पुणे महानगरपालिका नविन विस्तारीत इमारतीमधील नगरसचिव कार्यालय,उप महापौर कार्यालय व इतर दालनामधील फर्निचर व सुशोभिकरणाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बसेरा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,२६,५१७/– पेक्षा ०.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.४३,२१,७५७=८३ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.५,१९,१८२=०४ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.७,७१८/–पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२४४, दि.१६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३७ त्वर्य**

प्रभाग क्र. २५ ब मधील शिवरकर गार्डनमध्ये विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्रेयस डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,७२,४२०/– पेक्षा १३.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०,१९,९६३=६७ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रू.३,६२,३९५=६४ रॉयल्टी चार्जेस र.रू.१,०६,००५/– अधिक टेस्टिंग चार्जेस र.रू.४,०९५/– पर्यंत रक्कम ठेकेदारास अदा करणेस तसेच अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२४५ दि.१६/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३८ त्वर्य**

धानोरी जकात नाका ते डी.वाय.पाटील पर्यंत ३० मी.रूंदीचा रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्ही.एम.मातेरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५,३२,७२,०८१=२५ पेक्षा १५.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ४,४९,०८,३६४=४९ पर्यंत काम करून घेणेस, अधिक जी.एस.टी. र.रुपये ६३,९२,६४९=७५ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.२,७८,१५६=९५ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये ५१,९२५/– अधिक टेंडर अटीशर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात

करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२४८ दि. १७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४३९ त्वर्य**

साईनाथनगर वडगाव शेरी परिसरात नव्याने विकसित होणाऱ्या उद्यानामध्ये विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लाड ॲण्ड असोशिएटस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ३१,१३,२३६/- पेक्षा ५% कमी दराने)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रू.२९,५७,५७४=२० अधिक जी.एस.टी. १२% र.रू.३,५४,९०८=९० असे एकूण र.रु. ३३,१२,४८३=१० जीएसटीसह पर्यंत उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१२४९ दि.१७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४० त्वर्य**

प्रभाग क्र.२५ क केदारीनगर परिसरात रस्ते व फुटपाथ विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विठ्ठल एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३४,७२,३२६/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ३४,३७,६०२=७४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,१६,६७९=१२ अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये ४४,७८८/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.६५,७२३=१० पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२५० दि. १७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४१ त्वर्य**

येवलेवाडी परिसरातील भैरोबानाला व परिसरात अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेल्या मुख्य मलवाहिन्या व चेंबर्स दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८३,१२,६२४/- पेक्षा २८.१९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५९,६९,२९५=२९ व अधिक जी.एस.टी र.रू.७,१६,३१५=४३ एकूण र.रु. ६६,८५,६१०=७२ पर्यंत + कन्सलटंसी चार्जेस र.रू.८३,१२६=२४ पर्यंत + टेस्टिंग चार्जेस र.रू.६,७२०/- पर्यंत व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/१२५१ दि.१७/३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४२ त्वर्य**

प्रभाग क्र. ८ अ मधील विपश्यना केंद्राचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कदम ब्रदर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३०,९६,९०९/- पेक्षा ७.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.२८,७७,०२८=४६ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.३,७१,६२९=०८ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १७,६६७=५० पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.१३,४४०/- पर्यंत अधिक अटीशर्तीतील सिमेंट,स्टील यांना विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२५२, दि.१७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४३ त्वर्य**

प्रभाग क्र.३८ ड मधील गुजरवाडी रस्त्यावर भूमिगत केबल टाकुन रस्त्यात अडथळा ठरणारे म.रा.वि.वि.कंपनीचे पोल व तारा काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.डि.के.इलेक्ट्रीकल्स् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ३३,३५,०००/- पेक्षा ०.९०% कमी दराने)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रू.३३,०४,९८५/- अधिक जी.एस.टी. १२% र.रू.३,९६,५९८=२० व म.रा.वि.वि.कं. चे सुपरव्हीजन चार्जेस र.रु. ३७,९६०/- असे एकूण र.रु. ३७,३९,५४३=२० पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१२५३ दि.१७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४४ त्वर्य**

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व्यायाम शाळांसाठी अत्याधुनिक व्यायाम साहित्य पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.त्रिमुर्ती इंजिनियरिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ४,५५,७४,९७५/- पेक्षा ४% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४,३७,५१,९७६/- पर्यंत खरेदी करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास, तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्रं. मआ/भांडार/१२५४ दि. १७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४५ त्वर्य**

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी ओपन जिम साहित्य पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एज्युनीड्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ९०,९७,१९०/- पेक्षा २३.०००% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ७०,०४,८३६=३०० पर्यंत खरेदी करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास, तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्रं. मआ/भांडार/१२५५ दि. १७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४६ त्वर्य**

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांसाठी व विविध ठिकाणी खेळणी साहित्य व ओपन जिम पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एज्युनीड्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ६९,२७,०८०/- पेक्षा २१.०००% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ५४,७२,३९३=२०० पर्यंत खरेदी करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास, तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्रं. मआ/भांडार/१२५६ दि. १७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४७ त्वर्य**

प्रभाग क्र.१५ अ, शनिवारवाडा येथे व्हर्चुअल रियालिटी शो उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्हिएटीव्ह लॅब्स प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ५२,२३,३८२/- पेक्षा २४.५०% कमी (पुगपमधील र.रु. ५१,९८,३९०/- पेक्षा २४.५०% कमी दराने असल्याने त्यांचेकडून र.रू.३९,२४,७८४=४५ अधिक जी.एस.टी. १८% र.रू.७,०६,४६१=२० = र.रु. ४६,३१,२४५=६५) व (पुगपमधील र.रु. २४,९९२/- पेक्षा २४.५०% कमी दराने म्हणजेच र.रु. १८,८६८=९६ वर जी.एस.टी. १२% र.रू.२,२६४=२८ = र.रुपये २१,१३३=२४) असे एकूण र.रु. ४६,५२,३७८=८९ पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१२५९ दि.१७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २४४८ त्वर्य**

सन २०१९-२० करिता क्रीडा शिष्यवृत्ती तसेच मार्गदर्शक व खेळाडूंना पुरस्कार देणेसाठी खालील अ.क्र.१ ते ७ बाबीस मान्यता देण्याबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.म.आ/क्रिडा/११८९ दि.९/३/२०२० चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. ३६ दि.१२/३/२०२० विचारासाठी.

१ पुणे महानगरपालिका हद्दीतील क्रीडा शिष्यवृत्ती पात्र १५३ खेळाडूंना क्रीडा धोरणातील तरतुदीनुसार मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या यादीप्रमाणे र. रू.३३,४०,०००/- पर्यंत क्रीडा शिष्यवृत्ती देणेस

२ पुणे महानगरपालिका हद्दीतील ०५ मार्गदर्शक व खेळाडूंना कै.बाबुराव दगडू गायकवाड पुरस्कार व हरिशचंद्र बिराजदार पुरस्कार ०१जीवन गौरव पुरस्कार प्रदान करणेस त्याप्रित्यर्थ पुरस्कार्थींना रक्कम रूपये २,५५,०००/- देणेस.

३ क्रीडा शिष्यवृत्ती व क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडू/ मार्गदर्शक यांना सन्मानचिन्ह देणेकामी पुरवठादारास प्रत्यक्ष कामाच्या प्रित्यर्थ होणारे बिल अदा करणेस (र.रू.१,२५,०००/- प्रत्यक्ष होणा-या कामाच्या मोबदल्यात नगरसचिव कार्यालयाकडील पुरवठादार मे.वेदपाठक क्रिएशन यांना बिल अदा करणेस)

४ क्रीडा शिष्यवृत्ती व क्रीडा पुरस्कार समारंभाचे आवश्यकतेनुसार व्हिडिओ चित्रीकरण/फोटोग्राफीचे काम करणा-या पुरवठादारास प्रत्यक्ष कामाच्या प्रित्यर्थ होणारे बिल अदा करणेस (र.रू.१५,०००/- पर्यंत होणा-या कामाच्या मोबदल्यात नगरसचिव कार्यालयाकडील पुरवठादार मे.टाईम्स व्हिजन यांना बिल अदा करणेस)

५ क्रीडा शिष्यवृत्ती व क्रीडा पुरस्कार समारंभासाठी आवश्यकतेनुसार पुष्पगुच्छ व स्टेज सजावट करणा-या पुरवठादारास प्रत्यक्ष कामाच्या प्रित्यर्थ होणारे बिल अदा करणेस (र.रू.१५,०००/- पर्यंत होणा-या कामाच्या

मोबदल्यात नगरसचिव कार्यालयाकडील पुरवठादार मे.गिरीष गिरीजा डेकोरेटर्स यांना बिल अदा करणेस)

६ क्रीडा शिष्यवृत्ती व क्रीडा पुरस्कार समारंभासाठी आवश्यकतेनुसार अल्पोपहार पुरविणा-या पुरवठादारास प्रत्यक्ष कामाच्या प्रित्यर्थ होणारे बिल अदा करणेस ( कोटेशन पध्दतीने र.रू.६०,०००/- पर्यंत होणा-या कामाचे मोबदल्यात बिल अदा करणेस)

७ वरील उपरोक्त रक्कम रूपये ३८,१०,०००/- पर्यंतचा खर्च क्रीडा विभागाकडील खालील नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस

सन २०१९-२० (**RE27A172**)
१७-खेळ व क्रीडांगणे
क.- पं.नेहरू स्टेडियम
१७२ - पुणे शहरातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य पातळीवर प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंना शिष्यवृत्ती देणे
उपलब्ध रक्कम-२०,००,०००/-

सन २०१९-२०(**RE27D115**)
१७-खेळ व क्रीडांगणे
ख.- पं.नेहरू स्टेडियम, क्रीडा धोरणानुसार
११५- उदयोन्मुख खेळाडूंसाठी क्रीडा पुरस्कार देणे
उपलब्ध रक्कम-२०,००,०००/-

विषय क्रमांक :- २४४९ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे मनपा सेवकांसाठी चहापानाचा कार्यक्रम शनिवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२० रोजी, सायंकाळी ६.०० (सहा ) वाजता पुणे महानगरपालिका मुख्य भवना समोरील, हिरवळ येथे आयोजित करण्यात आला होता. सदर चहापान कार्यक्रमासाठी पुणे शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना मा. महापौर यांचेमार्फत निमंत्रणे पाठविण्यात आली होती. सदर कार्यक्रमासाठी सनई वादनाची पुर्णवेळ व्यवस्था करण्याचे आदेश मा. महापौर यांनी दिले असून त्यानुसार, सदर कार्यक्रमप्रसंगी मे. तुकाराम दैठणकर, सनईवादक, पुणे ४११००२ यांचेकडून वादन व्यवस्था करण्यात आली. त्याप्रित्यर्थ मे. तुकाराम दैठणकर, सनईवादक, पुणे ४११००२ यांनी रक्कम रूपये ७०००/- (सात हजार रुपये फक्त) चे बिल सादर केले आहे .

तरी मे. तुकाराम दैठणकर, सनईवादक, पुणे ४११००२ यांनी दिलेले ७०००/- (सात हजार रुपये फक्त) चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस व बिलाची रक्कम संबंधितास अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ६८८३ दि.१७/०३/२०२० चे पत्र.

सन २०१९ - २०२० चे अंदाजपत्रक
१. मुख्य देखरेख वसुली वगैरे
क. महानगरपालिका व स्थायी समिती
१. नगरसचिव यांचे कार्यालय
पान क्र. १४०
यादी क्र. R2
बजेट कोड RE11A275/ R2-1
महानगरपालिका वर्धापनदिन/सुवर्ण महोत्सव साजरा करणे.
बजेट तरतूद र.रु. ७,००,०००/-
(अक्षरी र.रु. सात लाख फक्त)

विषय क्रमांक :- २४५० त्वर्य

मा.दिपक पोटे व मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या सन २०१९-२० च्या ३ ते २५ लक्ष पर्यंतच्या कामाच्या गुणवत्ता तपासणी करणेसाठी संदर्भ क्र १ व २ नुसार त्रयस्थ गुणवत्ता संस्थेची नेमणूक निविदा प्रक्रिया राबवून करण्यात आली आहे . परंतु निविदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देण्यास विलंब होऊन कामाच्या टेंडर रक्कमेवर परफॉरमन्स सिक्युरिटी डिपोझिट दिल्यानंतर फेब्रुवारी अखेर कार्यादेश देण्यात आले आहेत.त्यामुळे त्रयस्थ गुणवत्ता संस्थेस काम करण्यास कालावधी मिळाला नाही. त्यामुळे व पुढील

आर्थिक वर्षी पूर्ण वेळ गुणवत्ता तपासणी यंत्रणा उपलब्ध राहणेसाठी मागील कार्यादेश दिलेल्या त्रयस्थ गुणवत्ता संस्थाना सन २०२०-२१ च्या क्षेत्रीय कार्यालयाच्या ३ ते २५ लक्ष पर्यंतच्या गुणवत्ता तपासणी करणेसाठी सन २०१९-२० च्या कार्यादेशाची मुदत वाढवून देण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २४५१ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे, आमदार व मा.दिपक पोटे यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या सन २०२०–२०२१ साठी प्राथमिक विभागातील बालवाडी ते ८ वी सर्व माध्यमाच्या तसेच माध्यमिक विभागातील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थीनींना प्रत्येकी २ संच शालेय गणवेश व २ संच पी.टी. गणवेश देण्यात यावा. तसेच गणवेश ही बाब दिनांक ४ जुलै २०१९ शासनाच्या नियोजन विभागातून वगळण्यात आल्याने पुणे महानगरपालिकेने सुद्धा सदर डि.बी.टी. योजनेतून गणवेश बाब वगळून शासनाच्या अंगिकृत व्यवसायांची आर्थिक क्षमता सक्षम होण्यासाठी शासनाचे अंगिकृत संस्था महाराष्ट्र राज्य यंत्र माग महामंडळ मर्यादित यांचेकडून पुणे महानगरपालिकेसाठी प्राथमिक व माध्यमिक विभागातील शाळेत शिक्षण घेत असणा–या सर्व माध्यमाच्या विद्यार्थांना २ शालेय गणवेश व २ पी.टी. गणवेश खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने त्वरीत कार्यवाही करून तसेच कापड व रंगसंगती सहीत प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समिती समोर सादर करावा. जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या मापानुसार व स्थायी समिती मान्य कापड व रंगसंगतीनुसार विद्यार्थी गणवेश व पी.टी गणवेश विद्यार्थांना दिनांक १५ जून रोजी शाळावार वाटप सुरू होऊन दिनांक १५ ऑगस्ट पूर्वी महानगरपालिकेतील सर्व विद्यार्थांना शालेय गणवेश व पी.टी.गणवेश परिधान करता येतील. सदर सभा वृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २४५२ त्वर्य**

मा.बाळासाहेब ओसवाल व मा.प्रकाश ढोरे यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

श्री.शिवस्वरा कन्सल्टंट, ३०३ कोंढवा खुर्द, स.नं. ११७/८, सिल्व्हर इस्टेट, एन.आय.बी.एम. रोड, पुणे ४८ ही फर्म गेले अनेक वर्षापासून आर्किटेक्ट कन्सल्टंट म्हणून चांगल्या रितीने काम करीत आहे.

त्यांच्या इतक्या वर्षाच्या कामाचा व अनुभवाचा विचार करता त्यांना पुणे मनपा पथ तसेच भवन व उद्यान विभागामार्फत व क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता सल्लागार यांचे यादीत तज्ञ सल्लागारांच्या पॅनेल वर्ग (I)(प्रोजेक्ट र.रुपये ०.० ते ५.०० कोटीपर्यंत) समाविष्ट करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २४५३ त्वर्य**

पुणे शहरात सध्या कोरोना विषांणुमुळे रूग्णांची संख्या वाढत आहे.त्याकरीता उपाययोजना आरोग्य विभाग करीत आहे.सध्या पाच ठिकाणी विलगीकरण कक्ष प्रस्तावित आहे.

डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालयाकरीता कोरोना आजाराचे वॉर्डकरीता औषधे साधनसामुग्री लोकल पर्चेस मधील मान्य ठेकेदाराकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७, ३ (क ) अन्वये रक्कम रूपये ५०,००,०००/– ( अक्षरी रक्कम रूपये पन्नास लाख फक्त ) पर्यंत खरेदी करणेस मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/१२०२ दिनांक १६/३/२०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.सदर खरेदीसाठी खालील अर्थशिर्षकावर पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

अर्थशिर्षक सन २०१९–२०

CE17A 242/SJ-6-93

भारत रत्न अटल बिहारी वाजपेयी वैदयकिय महाविदयालय

मान्य तरतूद रक्कम रूपये १०,००,००,०००/ पैकी ५०,००,०००/–

तरी वरील सर्व बाबींचे अवलोकन होउन डॉ.नायडू सांसर्गिक रोग रूग्णालयाकरीता कोरोना आजाराचे वॉर्डकरीता औषधे,साधनसामुग्री लोकल पर्चेस मधील मान्य ठेकेदाराकडून खरेदी करण्यात येत आहे.सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२४६ दि. १७/०३/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :- २४५४ त्वर्य

पुणे महानगरपालिकेमध्ये कोरोना विषाणू न्युमोनियाचे संशयित रूग्ण आढळले आहेत. सदर स्थिती आपातकालीन आहे अशा परिस्थितीमध्ये हा आजार सांसर्गिक असल्याने हा आजार पसरण्याची शक्यता आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७.३(क) नुसार उपलब्ध असलेल्या अखर्चीक पुढील आर्थिक तरतूदी मधून सोडीयम हायपोक्लॉराईड सोल्युशन (५%) ५००० लिटर निविदा क्रमांक २३ सन २०१९ सन २०१९-२० मधील मान्य ठेकेदार ओसवाल एंटरप्राईजेस यांचेकडून आणि डिस्पोजेबल फेसमास्क ३ लेयर ५ लाख नग निविदा क्रमांक २८ मधील मान्य ठेकेदार फार्मासिया लिंक या दोन निविदाधारकांकडून आवश्यकतेनुसार व मागणीनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७, ३ क अन्वये रक्कम रूपये २०,००,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये वीस लाख फक्त ) पर्यंत खरेदी करणेस मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/१२०३ दिनांक १६/३/२०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.सदर खरेदीसाठी खालील अर्थशिर्षकावर पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

अर्थशिर्षक सन २०१९-२० CE17A 242/SJ-6-93 भारत रत्न अटल बिहारी वाजपेयी वैदयकिय महाविदयालय मान्य तरतूद रक्कम रूपये १०,००,००,०००/ पैकी २०,००,०००/-

तरी वरील सर्व बाबींचे अवलोकन होउन डॉ.नायडू सांसर्गिक रोग रूग्णालयाकरीता कोरोना आजाराचे वॉर्डकरीता औषधे,साधनसामुग्री लोकल पर्चेस मधील मान्य ठेकेदाराकडून खरेदी करण्यात येत आहे.

सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२४७ दि. १७/०३/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :- २४५५ त्वर्य

पुणे शहरात सध्या कोरोना विषांणुमुळे रूग्णांची संख्या वाढत आहे. त्याकरीता उपाययोजना आरोग्य विभाग करीत आहे.कोरोना विषांणुमुळे रूग्ण अत्यावस्था स्थितीत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.याकरीता डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालयाकरीता आय.सी.यु.सुरू करणेकरीता शस्त्रे,उपकरणे, साधनसामुग्रींची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७, ३ (क ) अन्वये क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांचेकडून जीएसटी करासह रक्कम रूपये ५६,४८,६८६/- ( अक्षरी रक्कम रूपये छपन्न लाख अठठेचाळीस हजार सहाशे शहाऐंशी फक्त ) पर्यंत खरेदी करणेस मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्रमांक ६/१२०४ दिनांक १६/३/२०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.सदर खरेदीसाठी खालील अर्थशिर्षकावर पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE17F153G
महापौर निधी
मान्य तरतूद रक्कम रूपये २,००,००,०००/ पैकी ५७,००,०००/-

तरी वरील सर्व बाबींचे अवलोकन होउन डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालयाकरीता आय.सी.यु.सुरू करणेकरीता शस्त्रे,उपकरणे, साधनसामुग्रींची क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांचेकडून खरेदी करण्यात येत आहे.

सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२५७ दि. १७/०३/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :- २४५६ त्वर्य

पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या ) "स्वारगेट ते कात्रज"टप्पा क्रया वाढीव भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम (२ . यांचे मार्फत राबविण्या .महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/१२२७ दि.१६/३/२०२० चे पत्र.

१) स्वारगेट ते कात्रज (टप्पा क्र. २) या वाढीव भुयारी मेट्रो मार्गीकेचे काम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचे मार्फत राबविण्यास.

२) स्वारगेट ते कात्रज (टप्पा क्र. २) या वाढीव भुयारी मेट्रो मार्गीकेचे काम करणेसाठी मनपा हिश्श्याची जमिनीची किंमत व पुनर्वसन खर्चासहित र. रु. २३३.७५ कोटी केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळालेनंतर खर्च करणेस.

३) सदर प्रकल्प राबविणेसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून उचलण्यात येणाऱ्या कर्ज रक्कमेची कोणत्याही स्वरुपाची हमी पुणे मनपा तर्फे दिली जाणार नाही.

४) सदर प्रकल्प राबविणेकरिता केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडे पाठपुरावा महा मेट्रोचे स्तरावर करणेस .

५) स्वारगेट ते कात्रज ही विस्तारित भुयारी मेट्रो मार्गिका व (२.टप्पा क्र)त्यावरील मेट्रो स्टेशन बांधकाम विकास विभागामार्फत डी.नकाशावर दर्शवून घेणेस .पी .

**विषय क्रमांक :– २४५७ त्वर्य**

आंतरराष्ट्रीय पातळीवर कबड्डी व खेळामधून पुणे शहराचे नाव उंचावण्यासाठी तसेच क्रीडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने यासाठी पुणे महानगरपालिका व्यावसायिक कबड्डी संघ (महिला/पुरूष) स्थापन करून या संघासाठी खेळाडुंची, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापकांची, फिटनेस ट्रेनर यांची नेमणूक करण्यात यावी तसेच या खेळासाठी व खेळाडुंसाठी लागणारे सर्व साहित्य (कीट) उपलब्ध करून देऊन प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, फिटनेस ट्रेनर व खेळाडूंना मासिक मानधन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अमोल बालवडकर यांचे दि.१०/२/२०२० चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. ३३ दि.२७/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्रमांक :– २४५८ त्वर्य**

प्रभाग क्र.२५ अ मध्ये पुणे महानगरपालिकेच्या वतीने नागरीकांच्या सोईसाठी कै.सावित्रीबाई शिवरकर बहुउद्देशिय हॉल बांधला असुन सदर ईमारत मालमत्ता विभागाच्या ताब्यात आहे. सदर ईमारतीत तळ व दुस–या मजल्यावर दोन मोठे हॉल व पहिल्या मजल्यावर ४ छोटे हॉल बांधण्यात आलेले आहेत.

प्रभाग क्र.२५ मध्ये या ठिकाणी ई लायब्ररी करीता बजेट उपलब्ध असून येथे ई लायब्ररी व महिला संगणकीय प्रशिक्षण सुरू करण्याकरिता कै.सावित्रीबाई शिवरकर बहुउद्देशिय हॉल येथील पहिल्या मजल्यावरील ७५० स्क्वे.फु चे दोन छोटे हॉल या उपक्रमांसाठी नयी उडान (रजी.क्र.–एफ२६६५९) या संस्थेला नाममात्र भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.धनराज घोगरे व मा.राजु लायगुडे यांचे दि.१३/३/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३१५ दि.१३/३/२०२० विचारासाठी.
द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रमांक :– २४५९ त्वर्य**

मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. ५ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.७० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२० चे अंदाजपत्रक, १२. भवने, भुमि व मनपा वसाहतीची व्यवस्था, पान क्र.१०२, अ.क्र. ३६, शहरामध्ये समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका व्यायाम शाळा, विरंगुळा केंद्रे, ध्यानकेंद्रे महिला बचत गट हॉल, आधारकेंद्रे बांधणे (यादी क्र. एसजे-२०), पान क्र.२५१, अ.क्र.३०४, कल्याणीनगर येथील अमेनिटी स्पेस विकसित करणे. | ७० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे– | | |
| १)प्रभाग क्र. ५ अ मध्ये वडगावशेरी परिसरात ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ५ अ मध्ये वडगावशेरी भागात दफनभूमी येथे विविध सुधारणा कामे करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र. ५ अ मध्ये वडगावशेरी व कल्याणीनगर भागात भिंती रंगविणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र. ५ अ मध्ये मनपा इमारती व विविध सुधारणा कामे करणे. | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र. ५ अ मध्ये कचरा रॅम्प समोरील विविध सुधारणा कामे करणे. | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र. ५ अ मध्ये वडगावशेरी मध्ये दफनभूमी येथे विविध सुधारणा कामे करणे. | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र. ५ अ मध्ये वडगावशेरी मध्ये दफनभूमी परिसरात विविध सुधारणा कामे करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**